दुष्काळी भागातून स्थलांतरीत होणा-या कुटुंबांना शिधापत्रिका व शिधावस्तु देण्याबाबत

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : साविव्य-२०१३/प्र.क्र..७५/नापु-२८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई

तारीख: २६ फेब्रुवारी, २०१३

वाचा —

१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः साविव्य-१०९९/प्र.क्र.८८८६/नापु-२८, दिनांक ५.११.१९९९

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांकः एससीवाय-२०१२/प्र.क्र.२८२/म-७, दिनांक २२.०८.२०१२ व दिनांक २४.०८.२०१२

३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांकः एससीवाय-२०१२/प्र.क्र.४२८/म-७, दिनांक ९.०१.२०१३ व शासन शुध्दीपत्रक दिनांक २४.०१.२०१३, शा.नि.दि. ६.०२.२०१३.

४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांकः एससीवाय-२०१३/प्र.क्र.४/म-७, दिनांक २१.०१.२०१३

## शासन परिपत्रक :-

महसूल व वन विभागाने वर नमूद केलेल्या आदेशान्वये ज्या तालुक्यामध्ये ५०% पेक्षा कमी पर्जन्यमान झाले आहे किंवा ज्या तालुक्यात ५०% पेक्षा कमी पेरण्या झाल्या आहेत त्या तसेच अवर्षणप्रवण ( D.P.A.P.) भागातील ज्या तालुक्यात सरासरीच्या ७५% पेक्षा कमी पर्जन्यमान झाले आहे किंवा ७५% पेक्षा कमी पेरण्या झाल्या आहेत अशा तालुक्यात दुष्काळी / टंचाईसदृश्य परिस्थिती जाहिर केली आहे. त्यामुळे सदर दुष्काळी भागातील शहरामध्ये / गावांमधून काही लोक / शिधापत्रिकाधारक रोजगारासाठी तात्पुरत्या स्वरूपात इतरत्र स्थलांतरीत होण्याची शक्यता आहे. अशा स्थलांतरीत होणा-या शिधापत्रिकाधारकांना शिधापत्रिका व त्यावरील शिधावस्तू देणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

अ) एखादया जिल्हयातील शिधापत्रिकाधारक असलेले पुर्ण कुटुंब रोजगारासाठी व तात्पुरत्या वास्तव्यासाठी दुस-या जिल्हयात स्थलांतरीत होणार असेल तर संबंधित तहसिलदार / शिधावाटप अधिकारी यांनी ज्या महिन्यापासून असे कुटुंब स्थलांतर होईल त्या महिन्यापासून तात्पुरत्या स्वरूपात शिधावाटप बंद केलेले आहे, असे स्वाक्षरी व शिक्क्यासह त्या कुटुंबाकडे असलेल्या शिधापत्रिकेवर लिहून द्यावे.

ब) एखाद्या कुटूंबातील फक्त काही सदस्य स्थलांतर करणार असतील तर किती युनिटचे शिधावाटप ज्या महिन्यापासून तात्पुरत्या स्वरुपात बंद केले आहे, त्याबाबत मुळ शिधापत्रिकेची तसेच त्या शिधापत्रिकेच्या दुय्यम प्रतीवर स्वाक्षरी व शिक्क्यासह संबंधित तहसिलदार/ शिधावाटप अधिकारी यांनी लिहून द्यावे. मात्रा शिधापत्रिकाधारकाच्या कुटूंबातील जे सदस्य स्थलांतर करणार नाहीत, त्यांच्या युनिटनुसार मूळ ठिकाणी धान्य पुरवठा सुरु ठेवण्यात यावा.

क) एखाद्या जिल्हयातून शिधापत्रिकाधारक असलेले संपूर्ण कुटुंब किंवा त्या कुटुंबातील काही सदस्य ज्या जिल्हयात रोजगारासाठी व तात्पुरत्या वास्तव्यासाठी येतील, त्या ठिकाणच्या तहसिलदारांनी / शिधावाटप अधिका-यांनी मुळ जिल्हयातील तहसिलदार / शिधावाटप अधिका-यांचे वरील (अ) व (ब) येथे नमूद केल्याप्रमाणे नोंद असलेली शिधापत्रिका / शिधापत्रिकेची दुय्यम प्रत सादर करणा-या शिधापत्रिकाधारकास त्या ठिकाणी असेपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात मूळ शिधापत्रिकेनूसार (उदा. अंत्योदय, बीपीएल, केशरी, अन्नपूर्णा) पामतेल, धान्य केरोसीन व साखर या शिधावस्तुंचा पुरवठा करावा.

ड) संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयातून अशाप्रकारे स्थलांतरीत होणा-या कुटुंबांकडे असलेल्या प्रवर्गनिहाय शिधापत्रिकांची माहिती दर महिन्यास घेवून तेवढया कुटुंबांच्या अन्नधान्यांची / केरोसीनची मागणी कमी करावी. तसेच ज्या जिल्हयात अशी कुटुंबे स्थलांतरीत होतील किंवा झाली असतील, अशा कुटुंबांच्या शिधापत्रिका सुरू केल्यानंतर त्याच महिन्यात त्यांना अनुज्ञेय अन्नधान्य व केरोसीन वितरित करण्यासाठी नियतनाची आवश्यकतेप्रमाणे सुधारित मागणी करण्यात यावी.

ई) उपरोक्त परिस्थितीत दरमहा अन्नधान्य / केरोसीनचे तालुकानिहाय नियतन निश्चित करताना मागील महिन्यात स्थलांतरणामुळे तालुकानिहाय कमी / जास्त झालेल्या शिधापत्रिकेची प्रवर्गनिहाय संख्या विचारात घ्यावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०२२६१४५६५४८९०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bapu Balasaheb Narayankar

Digitally signed by Bapu Balasaheb Narayankar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=FCSCP, postalCode=400032, st=MAHARASHTRA, cn=Bapu Balasaheb Narayankar
Date: 2013.02.27 15:19:39 +05'30'

**बा. बा. नारायणकर**

उपसचिव,

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव

२) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव

३) मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव

४) मा. मुख्य सचिव

५) सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग

६) सर्व विभागीय आयुक्त

७) सर्व उपायुक्त (पुरवठा)

८) सर्व जिल्हाधिकारी / सर्व अप्पर जिल्हाधिकारी

९) नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई

१०) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/ सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी

११) वित्तीय सल्लागारी व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

१२) सर्व सह सचिव / उप सचिव/ अवर सचिव / कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

१३) खाजगी सचिव, सर्व मंत्री कार्यालये / सर्व राज्यमंत्री कार्यालये

१४) खाजगी सचिव, मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

१५) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

१६) प्रधान सचिव, अन्न, नागारी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

१७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई

१८) कार्यासन नापु-२८ निवड नस्ती